# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ५८७ /२०२१-२२ दिनांक :- 28/02/2022

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

Gunijan

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 591 /2021-22 दिनांक :- 28 /02/2022

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (पु.) येथील श्री शिवालय देवस्थान ट्रस्ट येथील आवारात झाड वाढलेले असून सदर झाडाची मुळ देवस्थानच्या भिंतीमध्ये गेलेली आहेत. त्यामुळे भिंत कमकुवत झालेली आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. **(शिवालय देवस्थान ट्रस्ट यांचे दि.24/01/2022 रोजीचे पत्र.)** | 01 नग स्पॅथोडीया |
| 2. | भाईंदर (पु.) जेसलपार्क येथील डिवाईन लाईफ अँड डिवाईन लॅण्ड सोसायटीच्या आवारात झाडे वाढलेली असून सदर झाडाची मुळ गेटच्या भिंतीमध्ये गेलेली आहेत. त्यामुळे भिंत कमकुवत झालेली आहे. जोराच्या वाऱ्याने झाडे पडून जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर झाडे तातडीने काढणे आवश्यक आहे. **(डिवाईन लाईफ अँड डिवाईन लॅण्ड को.ऑ.हौ.सोसायटी यांचे दि.02/02/2022 रोजीचे पत्र)** | 02 नग निलगीरी |
| 3. | भाईंदर (पु.) जेसलपार्क येथील कपुर टॉवर बि.नं.4 सोसायटीच्या बाहेरील मनपा रोडवर 1 नग गुलमोहराचे झाड वाढलेले असून सदर झाड इमारतीच्या दिशेने झुकलेले आहे तसेच झाडाचा बुंधा अर्धाकुजलेल्या स्थितीत आहे. त्यामुळे जोराच्या वाऱ्याने झाडे पडून जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. **(श्री.मदन उदितनारायण सिंह सन्मा.नगरसेवक यांचे दि.08/02/2022 रोजीचे कपुर टॉवर सोसायटीतील धोकादायक झाड काढणेबाबतचे पत्र)** | 01 नग गुलमोहर |
| 4. | भाईंदर (पु.) केबीन क्रॉस रोड येथील ओम साई लक्ष्मी पुजा को.ऑ.हौ.सोसायटीच्या आवारात 1 नग नारळाचे झाड वाढलेले असून सदर झाडाचे नारळ व सुकलेल्या झावळया पडून शेजारी राहणाऱ्या रहिवाशांच्या जिवास धोका निर्माण होत आहे.. या कारणास्तव सदर झाड तातडीने मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(श्री.श्रीप्रकाश जी.सिंह सन्मा. नगरसेवक यांचे दि.19/01/2022 रोजीचे ओम साई लक्ष्मी पुजा को.ऑ.हौ. सोसायटीतील धोकादायक झाड काढणेबाबतचे पत्र)** | 01 नग नारळ |
| 5. | भाईंदर (पु.) नवघर क्रॉस रोड येथील साई संकल्प सदन को.ऑ.हौ.सोसायटीच्या आवारात 1 नग पिंपळाचे झाड वाढलेले असून सदर झाडाची मुळ शेजारी असलेल्या गटारात गेलेली आहे. त्यामुळे गटाराचे पाणी साचून दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. या कारणास्तव सदर झाड तातडीने मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(साई संकल्प को.ऑ.हौ.सोसायटी यांचे दि.21/10/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग पिंपळ |
| 6. | भाईंदर (प.) प्रभाग क्र.23 मधील मुर्धा गाव येथील सावित्रीबाई फुले उदयान येथे सेल्फी पॉईंट बांधणेत येत असून सदर कामात 02 नग अशोकाची झाडे बाधीत आहेत. या कारणास्तव सदर झाडे तातडीने काढणे आवश्यक आहे. **(मा.कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.मनपा/वृ.प्रा/साबां/7888/2021-22 दि.22/02/2021 रोजीचे पत्र.)** | 02 नग अशोक |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\2020-21-IP\SABHA\All Jahirat Prasidhi\2020\5. NOV 2020